सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३२९ | शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५४८०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १४३२०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ ११९२०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २४६०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे
अभीष्टचिंतन




श्री. जितेंद्र ठाकूर
पत्रकार


ॲड. सुरेश सोनवणे
अमळनेर


श्री. रमेश पाटील
अमळनेर


श्री. उज्ज्वल केले
अमळनेर/पुणे


ॲड. के. व्ही. कुलकर्णी
अमळनेर

## ॲड. खासदार उज्ज्वल निकम यांनी सपत्नीक घेतले श्री मंगळग्रह देवाचे दर्शन...!








अमळनेर : नामांकित विशेष सरकारी वकील तथा खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांनी त्यांच्या धर्मपत्नी सौ. ज्योतीताई यांच्यासमवेत गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी येथील श्री मंगळग्रह मंदिरास भेट देऊन श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले. त्यांचा मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे श्री मंगळग्रह देवांची प्रतिमा देऊन सत्कार करताना अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले. शेजारी उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, ॲड. गोपाल सोनवणे, डॉ. अनिल वाणी, अविनाश अमृतकर, रोनक संकलेचा, मंगल सेवेकरी आशिष चौधरी आदी. यावेळी ॲड. निकम यांनी श्री मंगळग्रह मंदिरासह मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा आदी विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. तसेच प. पू. संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेलाही भेट देऊन तेथील वृक्षारोपण, गांडूळ खत, गोवरी निर्मिती, गुलाब बाग, प्लास्टिक क्रशिंग, जैविक द्रव खतप्रणाली तसेच निसर्ग बैठक या विभागांचीही अतिशय सखोल माहिती जाणून घेतली. याप्रसंगी ॲड. निकम यांनी मंगळग्रह सेवा संस्थेच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमांचे तोंडभरून कौतुक केले. (सर्व छायाचित्रे : मयूर चौधरी)

# प्रभाग क्र. ७ देशमुखनगरातील रस्ता तीस वर्षे उलटूनही 'जैसे थे'च!


## नागरिकांमध्ये कमालीचा संताप; पालिका प्रशासनाच्या उदासीनतेचा कहर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील पिंपळे रोड व ढेकू रोडवरील प्रभाग क्र. ७ मधील देशमुखनगरातील सुरेश अहिरराव यांच्या घरापासून डी. ए. बागूल यांच्या घराच्या पुढील भागापर्यंतचा रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षांपासून नूतनीकरणाच्या अर्थात काँक्रिटीकरणासह अद्ययावत स्वरूपात होण्याच्या प्रतीक्षेत आहे.

शहराचा विस्तार गतीने होत असताना या रस्त्याची अवस्था मात्र अद्यापही कच्च्या स्वरूपाची आणि खड्ड्यांचे साम्राज्य असल्याचीच आहे. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांना विविध गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्याच्या अवस्थेमुळे परिसरातील रहिवाशांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्यात कमालीचा संताप व्यक्त होत आहे. या मार्गावर ठिकठिकाणी खडी-माती पसरलेली असून, रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात गवत व झुडपे तसेच खड्डेही मोठ्या प्रमाणात पडलेले आहेत.

पावसाळ्यात पावसाचे पाणी व चिखलामुळे रस्त्यावरून ये-जा करणे कठीण बनते. दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटनाही घडल्या असल्याने या रस्त्याने जाताना भीती वाटते, तर पादचाऱ्यांनाही चिखल तुडवत मार्ग काढावा लागतो. पाऊस थांबल्यानंतर रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होते. उन्हाळ्यात याच रस्त्यावरून वाहनांची ये-जा झाली की धुळीचे लोट उठतात. त्यामुळे परिसरातील रहिवाशांना धुळीचा त्रास सहन करावा लागतो. विशेष म्हणजे अनेक वर्षे उलटूनही या रस्त्याचा कायमस्वरूपी प्रश्न सुटलेला नाही, याबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. ▲



*अमळनेर : शहरातील पिंपळे रोड व ढेकू रोडवरील प्रभाग क्र. ७ मधील देशमुखनगरातील सुरेश अहिरराव यांच्या घरापासून डी. ए. बागूल यांच्या घराच्या पुढील भागापर्यंतचा रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षांपासून नूतनीकरणाच्या अर्थात काँक्रिटीकरणासह अद्ययावत स्वरूपात होण्याच्या प्रतीक्षेत आहे.*

### विकास झाला; रस्ता मात्र 'जैसे थे'

देशमुखनगर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात घरांची बांधकामे झाली. नागरिकांची संख्या वाढली. मात्र त्याच तुलनेत मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास झालेला दिसत नाही. रस्ता पक्का करण्याची मागणी करूनही हा प्रश्न प्रलंबितच असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून डांबरीकरण अथवा काँक्रिटीकरणाचे काम तातडीने हाती घ्यावे आणि २५-३० वर्षांपासून सुरू असलेली ही गैरसोय दूर करून नागरिकांना चांगला व सुरक्षित रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



*अमळनेर : शासकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ल्याचा राजपूत एकता मंचातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्याकडे दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या आशयाचे निवेदन देताना मंचाचे अध्यक्ष रणजीत पाटील, अनिल पाटील, चेतन राजपूत, जयराम पाटील, विलास पाटील, जयदीप पाटील, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, अमोल राजपूत, कुणाल गिरासे, भोजराज राजपूत, दिलीप पाटील, रोहिदास पाटील, विक्रम पाटील, सुनील पाटील, गणेश पाटील, प्रकाश पाटील, समाधान धनगर, अजयसिंग पाटील, आशिष राजपूत, भरतसिंग पाटील आदी.*

# शासकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ल्याचा राजपूत एकता मंचातर्फे तीव्र निषेध

## प्रांताधिकाऱ्यांना निवेदन; दोषींवर कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शासकीय कर्तव्य बजावताना ग्रामसेवक व महापालिका कंत्राटी कर्मचाऱ्यांवर झालेले प्राणघातक हल्ले अत्यंत निषेधार्ह आहेत. या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका राजपूत एकता मंचच्या वतीने प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले. त्यात दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की जळगाव जिल्ह्यातील शिवरे (ता. पारोळा) येथे ग्रामसभेदरम्यान शासकीय कर्तव्य बजावणारे ग्रामसेवक प्रल्हाद पाटील (वय ५२) यांच्यावर काही ग्रामस्थांनी जोरदार मारहाण केली.

(पान २ वर)

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!



*अमळनेर : येथील अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाचे संचालक संजय पुनाजी पाटील यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी व ब्युरो चीफ रजनीकांत पाटील.*

# अतिवृष्टीसह महापुरामुळे नुकसान पोहोचलेल्या शंकरनगर, संताजीनगरवासींना किराणा किट वाटप

## राष्ट्रवादी काँग्रेस व प्रशासनाच्या पुढाकारातून २५० वर पीडितांना दिला लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका हद्दीत अतिवृष्टीसह महापुरामुळे नुकसान झालेल्या पिंपळे रोडवरील शंकरनगर आणि बाजार समितीमागील गुरुकृपा कॉलनी व संताजीनगरातील नागरिकांना जीवनावश्यक वस्तू अर्थात किराणा किटचे गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी वाटप करण्यात आले.

दि. ३१ जुलै रोजी अमळनेर शहरात अतिवृष्टीमुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. यात बोरी नदी व पिंपळे नाला परिसरात राहणाऱ्या असंख्य नागरिकांच्या घरात पाणी घुसून मोठे नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने पालिका हद्दीतील नुकसानग्रस्त झालेल्या १८०० नागरिकांना जीवनावश्यक वस्तू अर्थात किराणा किटचे गेल्या आठवड्यात माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले होते. मात्र, काही पीडित नागरिक या मदतीपासून वंचित राहिले होते. त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे व नगरसेवक सचिन पाटील यांनी आमदारांकडे यासंदर्भात व्यथा मांडल्यानंतर आमदार पाटील यांनी प्रशासनास आणखी किट वाढविण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी या भागातील सुमारे २५० लाभार्थींना किराणा किट वाटप करण्यात आले.

(पान २ वर)



*अमळनेर : अतिवृष्टीसह महापुरामुळे नुकसान पोहोचलेल्या शंकरनगर, संताजीनगरमधील पीडितांना गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी किराणा किट वाटप करताना 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील. शेजारी नगरसेवक सचिन पाटील, नगरसेविका. सौ. योगीताताई कापडणेकर व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी.*

## संपादकीय

# शुद्धीकरणाचा 'ओव्हरडोस'

मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीच्या मोहिमेमध्ये (एसआयआर) नावे नोंदविण्याची मुदत संपत असताना महाराष्ट्रातील नऊ कोटी ८० लाख नावांपैकी सुमारे एक कोटी ८० लाख, म्हणजे जवळपास २० टक्के नावे आढळत नसल्याची आकडेवारी धक्कादायक आहे. त्यात मुंबईतील जवळपास ३० लाख नावे वगळली गेली असावीत, असा अंदाज आहे. आता नावे नोंदविण्यास मुदतवाढ मिळणार नाही, असे दिसते. त्यामुळे या वगळलेल्या नागरिकांपैकी मृत आणि दुबार नोंदी वगळता अन्य नागरिकांना पुन्हा नावे समाविष्ट करण्यासाठी यातायात करावी लागेल, हे नक्की. मतदारयाद्या 'शुद्ध' करण्यासाठी ही मोहीम असल्याचे सरकार आणि निवडणूक आयोग सातत्याने सांगत असून, त्यात तथ्यही आहे; मात्र मोहिमेदरम्यान प्रत्यक्ष अंमलबजावणीत आलेले अनुभव, वेगवेगळ्या त्रुटींचे प्रचंड प्रमाण आणि अखेरीस हाती आलेली आकडेवारी पाहता या शुद्धीकरणाचा 'ओव्हरडोस'च झाला की काय, असे वाटल्यास नवल नाही. आयोगातील अधिकारी-कर्मचारी, बूथस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून काम करणारे शिक्षक, कर्मचारी आणि आशा वर्कर्स यांनी गेले सुमारे तीन महिने पूर-पावसात कष्टप्रद स्थितीत कामे केली, याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. मात्र, या मोहिमेदरम्यान त्यांच्याबरोबरच मतदारांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले आणि अपुऱ्या मनुष्यबळासह 'ॲप'मधल्या त्रुटी, 'नेटवर्क'च्या समस्या आणि अवाजवी कागदपत्रांची सक्ती यांमुळे लाखो पात्र मतदारांची नावेही वगळली जाण्याची टांगती तलवार उभी राहिली आहे.

बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये पार पडलेल्या या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात प्रामुख्याने या मोहिमेच्या घटनात्मक वैधतेविषयी सर्वोच्च न्यायालयात मोठे मंथन झाले. मात्र, असा कार्यक्रम राबवण्याचा निवडणूक आयोगाला असलेला अधिकार मान्य करून न्यायालयाने तो कायदेशीर ठरवला. 'या मोहिमेतील निष्कर्ष हा नागरिकत्वाबाबतचा अंतिम निर्णय मानता येणार नाही,' असाही निर्वाळाही दिला. मात्र, कायदेशीर दृष्टीने ही मोहीम योग्य ठरली असली, तरी तिच्या अंमलबजावणीमधील अनियमिततांबाबत सुरुवातीपासूनच व्यक्त करण्यात येणाऱ्या शंका-अडचणींचे निवारण न्यायालयात झाले नाही. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात ऐन पावसाळ्यात हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमातही हेच अनुभव आले. राज्याच्या मतदारयादीतील नऊ कोटी ८० लाख नावांपैकी एक कोटी ८० लाख मतदार आढळलेले नाहीत. त्यामध्ये ३४ लाख मृत, ७६ लाखांचा तपास लागत नाही, ७७ लाख स्थलांतरित असा ढोबळ तपशील आहे. त्याशिवाय आढळलेल्या पावणेआठ कोटींपैकी अनेक नावेही पुरेशा पुराव्यांअभावी वगळली जाऊ शकतात. प्रत्येक 'बीएलओ' मतदारांच्या घरी तीन वेळा जाईल, असे आयोगाने जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात ते मतदारांच्या घरी किती वेळा गेले किंवा गेलेच नाहीत, हा तपासणीचा भाग आहे. अनेक ठिकाणी 'बीएलओ' मतदारांनाच बोलावून घेत होते; तसेच काही ठिकाणी राजकीय पक्षांच्या कार्यालयांमधून हा उपक्रम सुरू होता, अशाही तक्रारी आहेत.

मुळात 'बीएलओं'चे प्रमाण गरजेच्या तुलनेत प्रचंड अपुरे होते. मूळ याद्यांमधील चुकांचा अनेकांना फटका बसला आहे. विशेषतः वर्षानुवर्षे मतदान करीत असूनही, नियमाप्रमाणे 'सन २००२च्या यादीत नाव नाही,' या कारणाने अनेक प्रामाणिक मतदारांपुढे समस्या उभी ठाकली आहे; तसेच नव्या मतदारांनाही 'एसआयआर' पडताळणी अनिवार्य केल्यामुळे अशा मतदारांच्या पाल्यांचीही नावे कशी समाविष्ट होणार, हा प्रश्नच आहे. आता वगळल्या जाणाऱ्या मतदारांना नावे समाविष्ट करण्यासाठी अपील करावे लागेल. पश्चिम बंगालमध्ये अशाच वगळल्या गेलेल्या २७ लाख मतदारांना निवडणुकीपूर्वी अपीलाची संधी मिळाली नाहीच; उलटपक्षी 'पुढच्या वेळी मतदान करा,' असा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने दिला. आता ही अपीले निकालात काढत असताना त्यातील ८० टक्के पात्र मतदार असल्याचे आढळते आहे. मतदारयादी अचूक, अद्ययावत व पारदर्शक ठेवणे, हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. मात्र, 'अपात्र व्यक्ती मतदारयादीत राहणार नाही,' याबाबत जेवढा कटाक्ष ठेवण्यात आला; त्या तुलनेत 'पात्र मतदार हक्कांपासून वंचित राहू नयेत,' या तत्त्वाचे पुरेसे पालन झाले नाही, असे म्हणण्यास मोठा वाव आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ल्याचा राजपूत एकता मंचातर्फे तीव्र निषेध

पान १ वरून

यावेळी जीव वाचविण्यासाठी पळत असताना त्यांचा मृत्यू झाला. तसेच अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात महापालिका कंत्राटी कर्मचारी धीरज कचरूसिंग परदेशी (वय ३१) हे दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पथदिव्यांची दुरुस्ती करताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या घटनेत तेही मृत्युमुखी पडले. त्यामुळे या घटनांतील दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी. कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचे संरक्षण ही शासनाची जबाबदारी आहे, या भूमिकेतून वरील घटनांकडे गांभीर्याने पाहून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. राजपूत समाजातील दोन्ही पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी संबंधित प्रशासनाला निर्देश द्यावेत तसेच भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. अशा घटनांमुळे केवळ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत नाही, तर प्रशासनाच्या कामकाजावरही विपरीत परिणाम होतो.

निवेदन देतेवेळी मंचाचे अध्यक्ष रणजीत पाटील, अनिल पाटील, चेतन राजपूत, जयराम पाटील, विलास पाटील, जयदीप पाटील, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, अमोल राजपूत, कुणाल गिरासे, भोजराज राजपूत, दिलीप पाटील, रोहिदास पाटील, विक्रम पाटील, सुनील पाटील, गणेश पाटील, प्रकाश पाटील, समाधान धनगर, अजयसिंग पाटील, आशिष राजपूत, भरतसिंग पाटील यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## शंकरनगर, संताजीनगरवासींना किराणा किट वाटप

पान १ वरून

शंकरनगर येथे श्रीरंग कॉलनीत 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई अनिल पाटील यांच्या हस्ते १४६ लाभार्थींना किट वाटप करण्यात आले. यावेळी नगरसेवक सचिन पाटील व नगरसेविका. सौ. योगीताताई कापडणेकर उपस्थित होते. तर गुरुकृपा कॉलनी व संताजीनगरात पालिकेने नेमणूक केलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी १०० लाभार्थींना किट वाटप केले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भदाणे, वेद पाटील व नागरिक उपस्थित होते.

# युवा वर्गाला 'रोटरी'च्या माध्यमातून मार्गदर्शन गरजेचे

## रोटरी क्लबच्या पदग्रहण सोहळ्यात खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांचे मत





*अमळनेर : येथील रोटरी क्लबतर्फे गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी नर्मदा रिसॉर्टमध्ये आयोजित पदग्रहण सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना नामांकित विशेष सरकारी वकील तथा खासदार ॲड. उज्ज्वल निकम. दुसऱ्या छायाचित्रात पदग्रहण केलेले रोटरी क्लबचे विविध पदाधिकारी व सदस्य.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, ही सामाजिक बांधिलकी जोपासत रोटरी क्लब जगभर विविध उपक्रम राबवत असते. ही अतिशय समाधानाची बाब आहे. रोटरी क्लब रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे यांसारखी सेवाही जनतेला देत असते. मात्र, आजचा युवा वर्ग भरकटलेला दिसून येतो. त्यांना रोटरी क्लबच्या माध्यमातून योग्यरित्या मार्गदर्शन व समुपदेशन करणे गरजेचे असल्याने हे कार्य रोटरी क्लबने हाती घ्यायला हवे, असे मत नामांकित विशेष सरकारी वकील तथा खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केले.

येथील रोटरी क्लबच्या पदग्रहण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. नर्मदा रिसॉर्टमध्ये गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात हा सोहळा झाला. असिस्टंट गव्हर्नर ॲड. रूपेश पाटील व गनी मेमन (जळगाव) यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला रोटरी परिवारातील सदस्य व साने गुरुजी स्मारकाचे संस्थापक तथा माजी प्राचार्य अरविंद सराफ यांच्यासह सर्व दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा बुके देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. मावळते अध्यक्ष देवेंद्र कोठारी यांनी गतवर्षाच्या कार्याचा अहवाल सादर केला. त्यानंतर त्यांनी नूतन अध्यक्ष महेश पाटील यांना कॉलर, रोटरी चार्टर व हॅमर प्रदान करून पदभार सोपविला. मावळते सचिव आशिष चौधरी यांनी प्रशांत निकम यांच्याकडे सचिव पदाचा पदभार सोपविला. नूतन अध्यक्ष पाटील यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

असिस्टंट गव्हर्नर ॲड. पाटील यांनी 'आरआय डिस्ट्रिक्ट ३०३०'चे गव्हर्नर डॉ. राजेश पाटील यांचा संदेश वाचून दाखविला. ॲड. निकम यांच्या शुभ हस्ते मकसूद बोहरी यांनी संपादित केलेल्या 'सेवाचक्र' या रोटरी बुलेटीनचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर 'आरआय डिस्ट्रिक्ट ३०३०'मध्ये रोटरी इन्क्लेव्ह म्हणून कीर्तीकुमार कोठारी यांची सेक्रेटरी तर प्रीतपालसिंग बग्गा यांची जॉईंट सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. या दोघांचाही ॲड. निकम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. मेमन यांनी वृद्धाश्रमांची वाढती संख्या आणि त्यासाठी तीन ते पाच वर्षांची प्रतीक्षा यादी करणे सुरू झाले आहे, याबत चिंता व्यक्त केली. मुलांनी आई-वडिलांची जबाबदारी घेणे, ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

अजय रोडगे, प्रतीक जैन आणि आरती रेजा यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत निकम यांनी आभार मानले. सौ. पूर्वाताई वशिष्ठ यांनी पसायदान सादर केले.

यावेळी खासदार श्रीमती स्मिताताई वाघ, सौ. ज्योतीताई निकम, धरणगाव, पारोळा, चोपडा येथील रोटरी क्लबचे पदाधिकारी, लायन्स क्लब, अमळनेर वकील संघ, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, अमळनेर, मराठा समाजाचे अध्यक्ष जयवंतराव पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, खानदेश शिक्षण मंडळाच्या सौ. माधुरीताई पाटील, नीरज अग्रवाल, मनोहर निकम, ॲड. विलास वाणी, ॲड. मनोहर पवार, ॲड. तिलोत्तमा पाटील, सौ. भारतीताई सोनवणे यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यापारी, रोटरी परिवार व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घर क्रमांक नोंदणीमुळे वाढले 'एसआयआर'चे काम!

## नव्याने निर्देश आल्याने कर्मचाऱ्यांना पुन्हा दारोदारी फिरावे लागणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आता नव्याने घर क्रमांक नोंदविण्याचे निर्देश आल्याने 'बीएलओ' नाराज झाले आहेत. पुन्हा कर्मचाऱ्यांना घरोघरी जावे लागणार आहे. या प्रक्रियेत मतदार यादीतील घर क्रमांक अचूक असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक मतदाराचा प्रत्यक्ष घर क्रमांक 'नोशनल घर नंबर' या रकान्यात नमूद करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक प्रशासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

मतदार यादीचे सुसूत्रीकरण करताना मतदारांचे अनुक्रमांक त्यांच्या घर क्रमांकानुसार लावणे, एकाच घरातील कुटुंबीयांचा एकाच यादी भाग व सेक्शनमध्ये समावेश करणे, एका इमारतीतील मतदारांना शक्यतो एकाच यादी भागात ठेवणे तसेच एकाच रस्त्यावरील किंवा परिसरातील घरांमधील मतदारांना एकाच यादी भागात समाविष्ट करण्याच्या सूचना आहेत. मात्र, अनेक मतदारांच्या नावासमोर घर क्रमांक चुकीचे नमूद आहेत किंवा काही ठिकाणी घर क्रमांकच नमूद नसल्याने फॅमिली ग्रुपिंग करताना अडचणी निर्माण होत आहेत. काही ठिकाणी 'नोशनल घर क्रमांक' म्हणून मतदार यादीतील अनुक्रमांक नमूद असल्याने एकाच घरातील मतदारांची योग्य सांगड घालणेही शक्य होत नाही.

या पार्श्वभूमीवर इसिनेट प्रणालीमध्ये ई आर ओ लॉग-इनद्वारे प्रत्येक यादी भागाची मतदार यादी डाउनलोड करून, त्यातील 'नोशनल घर नंबर' या रकान्यातील जुन्या क्रमांकाऐवजी मतदाराचा प्रत्यक्ष व अचूक घर क्रमांक नमूद करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी संबंधित यादी स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून देण्यात येणार असून, ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिकेच्या संबंधित कर्मचाऱ्यांमार्फत घर क्रमांकांची पडताळणी केली जाणार आहे. यासाठी छापील यादीमध्ये जुन्या नोशनल घर क्रमांकावर काट मारून त्याऐवजी अचूक घर क्रमांक लिहिणे किंवा 'विवरण पत्र-२'मध्ये मतदारांच्या अनुक्रमांकानुसार अचूक घर क्रमांकाची माहिती भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार इसिनेटमधील प्रत्येक मतदारासमोरील नोशनल घर क्रमांक अद्ययावत करण्यात येणार आहे. या रकान्यात केवळ अंकांच्या स्वरूपात घर क्रमांक नमूद करता येणार आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रोहन घुगे यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणेला तातडीने निर्देश देऊन मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून प्राप्त याद्यांची पडताळणी करून अचूक घर क्रमांकांची माहिती विनाविलंब उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या आहेत. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचनेची तांत्रिक कार्यवाही निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.

### राहतात इकडे; मतदान तिकडे

काही मतदार राहतात दुसरीकडे आणि त्यांचे मतदान दुसरीकडे अशी परिस्थिती आहे. त्यांच्या घर क्रमांकावर दुसरेच राहतात त्यांची नावे तिसऱ्या ठिकाणी आहेत. एकाच घरातील काही लोक ग्रामीणमध्ये तर काही लोक शहरात मतदार यादीत नाव ठेवण्याचा आग्रह धरतात अशीही परिस्थिती आहे. 'एसआयआर' कार्यक्रमात आधीच घर क्रमांक घ्यायच्या सूचना असत्या तर कर्मचाऱ्यांची सांगड बसली असती. पुन्हा पुन्हा लोकांच्या घरी जाऊन वेळेचा अपव्यय आणि नियमित कर्तव्याकडे दुर्लक्ष होत आहे. शिक्षणाचा, विविध शासकीय कार्यालयातील कामांचा बट्ट्याबोळ होत आहे.

> *'बीएलओं'ना घर क्रमांक माहीत नाही तर पालिका कर्मचाऱ्यांना मतदार माहीत नाहीत. त्यामुळे मतदार, घर क्रमांक यांची सांगड घालण्यासाठी पालिका कर्मचारी आणि 'बीएलओ' एकत्र फिरल्याशिवाय 'एसआयआर'चे काम गतीने पूर्ण होणार नाही. काही ठिकाणी 'बीएलओ' सहकार्य करीत आहेत, तर काही ठिकाणी करीत नाही. यावर मार्ग काढून लवकर मोहीम फत्ते करण्याचे प्रयत्न आहेत.*
>
> **– गणेश शिंदे**
> **मुख्याधिकारी, अमळनेर पालिका.**

# दोन विवाहिता अमळनेरमधून बेपत्ता




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : शहरातील रघुराजसनगर-शिरूड नाका आणि वड चौक-बालाजीपुरा परिसरातून मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी दोन विवाहिता बेपत्ता झाल्याच्या घटना घडल्या आहेत. दोन्ही घटनांबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात हरविल्याच्या तक्रारी दाखल झाल्या असून, पोलिसांकडून बेपत्ता महिलांचा शोध सुरू आहे.

रघुराजसनगर-शिरूड नाका परिसरात पालिका कर्मचारी कमलेश पाटील हे पत्नी सौ. माधुरीताई (वय २९) आणि मुलगा केतन यांच्यासोबत राहतात. मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता श्री. पाटील कामावर गेले होते, तर त्यांचा मुलगा केतन शाळेत गेला होता. त्यावेळी सौ. माधुरीताई घरी एकट्याच होत्या. सकाळी दहा वाजता श्री. पाटील यांनी शेजाऱ्यांना फोन करून पत्नी घरी आहे का, अशी विचारणा केली असता त्यांच्या घराला बाहेरून कडी लावलेली असल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर श्री. पाटील यांनी तातडीने घरी येऊन घरात तसेच आजूबाजूच्या परिसरात आणि शहरातील विविध भागांत सौ. माधुरीताईंचा शोध घेतला. मात्र त्या सापडल्या नाहीत. अखेर त्यांनी अमळनेर पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली. या घटनेचा पोलिस शिपाई नरेश बडगुजर तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत शहरातील वड चौक-बालाजीपुरा परिसरात नरेंद्र भिका कोतकर हे पत्नी सौ. चंद्रकलाताई (वय २६) आणि मुलगी शिवज्ञा (वय ३) यांच्यासमवेत राहतात. मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता चंद्रकला ही मुलगी शिवज्ञासोबत त्रिकोणी बागेजवळील महादेव मंदिरात दर्शन घेऊन येते, असे सांगून घरातून बाहेर पडली. बराच वेळ उलटूनही सौ. चंद्रकलाताई आणि मुलगी शिवज्ञा घरी परतल्या नाहीत. त्यामुळे नरेंद्र कोतकर यांनी मंदिर परिसरासह इतर ठिकाणी दोघींचा शोध घेतला. मात्र, त्या मिळून न आल्याने अखेर अमळनेर पोलिस ठाण्यात आई-मुलगी हरविल्याची तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेचाही पोलिस शिपाई नरेश बडगुजर तपास करीत आहेत.

# सोन्यातील गुंतवणुकीसाठी सरकारची नवी योजना

# घरातील सोन्यावर मिळणार व्याज




भारतीय कुटुंबांच्या बचतीमध्ये सोन्याला विशेष महत्त्व आहे. दागिने, नाणी आणि सोन्याचे बार अशा स्वरूपात मोठ्या प्रमाणात सोने घरात ठेवले जाते. मात्र, हे सोने घरात पडून राहिल्याने त्यातून नियमित उत्पन्न मिळत नाही. आता याच सोन्याला आर्थिक प्रवाहात आणून त्यावर परतावा मिळवून देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार 'गोल्ड मॉनेटायझेशन स्कीम'मध्ये बदल करण्याच्या तयारीत आहे. प्रस्तावित सुधारणांनुसार नागरिकांना घरातील सोने जवळच्या प्रमाणित सराफांकडे जमा करता येण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार सुरू आहे. त्याबदल्यात संबंधित नागरिकांना नियमित व्याज किंवा परतावा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे निष्क्रिय स्वरूपात घरात पडून असलेल्या सोन्याचा आर्थिक वापर करता येऊ शकतो.

**प्रमाणित सराफांचा सहभाग**

सध्याच्या योजनेत सोने जमा करण्यासाठी नागरिकांना बँका किंवा ठरावीक चाचणी केंद्रांवर जावे लागत होते. त्यामुळे योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. आता ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी प्रमाणित ज्वेलर्स आणि सराफ व्यावसायिकांना थेट योजनेशी जोडण्याचा सरकारचा विचार आहे.

सराफ हे ग्राहकांच्या दैनंदिन व्यवहाराशी जोडलेले असल्याने त्यांच्या माध्यमातून सोने जमा करण्याची सुविधा उपलब्ध झाल्यास योजनेची पोहोच वाढण्याची शक्यता आहे. सोन्याची शुद्धता तपासणी, वजन निश्चित करणे, नोंदणी आणि सुरक्षित साठवणूक यासाठी निश्चित नियम तयार केले जाण्याची शक्यता आहे.

**२०१५ मध्ये सुरू झाली होती योजना**

केंद्र सरकारने २०१५ मध्ये 'गोल्ड मॉनेटायझेशन स्कीम' सुरू केली होती. देशातील घरांमध्ये आणि विविध संस्थांकडे साठवून ठेवलेले सोने आर्थिक प्रवाहात आणणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. मात्र, सोने जमा करण्यासाठी बँका किंवा विशिष्ट चाचणी केंद्रांवर जावे लागत असल्याने नागरिकांचा सहभाग मर्यादित राहिला. उपलब्ध माहितीनुसार, गेल्या दशकात या योजनेअंतर्गत सुमारे ३८ ते ३९ टन सोनेच जमा झाले. देशातील घरांमध्ये असलेल्या सोन्याच्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प आहे.

**आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न**

भारतामध्ये सोन्याची मोठी मागणी असल्याने दरवर्षी मोठ्या प्रमाणात सोने आयात केले जाते. यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च होते. घरांमध्ये साठवून ठेवलेले सोने आर्थिक प्रवाहात आणल्यास देशातील उपलब्ध सोन्याचा वापर वाढू शकतो. परिणामी सोन्याच्या आयातीवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होऊन परकीय चलनाची बचत होण्यास मदत होऊ शकते.

### नागरिकांनी काय काळजी घ्यावी?

या प्रस्तावित योजनेचा अंतिम व्याजदर, किमान सोने जमा करण्याची मर्यादा, ठेव कालावधी, परतफेडीची पद्धत आणि इतर अटी अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेल्या नाहीत. त्यामुळे सोशल मीडिया किंवा अन्य माध्यमांतून प्रसारित होणाऱ्या व्याजदराच्या आकडेवारीवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. सरकारकडून अधिकृत घोषणा झाल्यानंतरच प्रमाणित सराफांची यादी आणि संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट होईल. सोने जमा करण्यापूर्वी शुद्धता, वजन, मूल्यांकन, पावती, सुरक्षितता आणि मुदतपूर्तीनंतर मिळणारा परतावा याबाबतची माहिती घेणे आवश्यक आहे. घरात वर्षानुवर्षे पडून असलेल्या सोन्याला आर्थिकदृष्ट्या सक्रिय करण्याचा सरकारचा हा प्रयत्न आहे. प्रमाणित सराफांच्या माध्यमातून सोने जमा करण्याची सुविधा प्रत्यक्षात आल्यास पूर्वीच्या योजनेपेक्षा नागरिकांचा सहभाग वाढण्याची शक्यता आहे. मात्र, योजनेचे अंतिम स्वरूप आणि व्याजदर केंद्र सरकारच्या अधिकृत घोषणेनंतरच स्पष्ट होतील. त्यामुळे अधिकृत माहिती मिळाल्यानंतरच या योजनेत सहभागी होण्याचा निर्णय घेणे योग्य ठरेल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# सर्कसमध्ये विकले जाणार होते ३ फुटांचे गणेश!

## मग सर्वोच्च न्यायालयातून लढाई जिंकून बनले डॉक्टर; 'केबीसी'मध्ये सांगितला प्रवास

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'व्यंग हे शरीरात असते, मनात नाही' हे सिद्ध करणाऱ्या डॉ. गणेश बारैया यांची यशोगाथा अत्यंत प्रेरणादायी आहे. ३ फूट उंचीमुळे कधी सर्कसवाल्यांनी ५ लाखांची बोली लावलेला हा चिमुरडा आज भावनगर येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून शेकडो रुग्णांचे प्राण वाचवत आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने नाकारलेला प्रवेश मिळविण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात ऐतिहासिक लढा दिला. भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी भावनगरमध्ये मुख्य अतिथी म्हणून त्यांच्या हस्ते मानाचे ध्वजवंदन करण्यात आले. संघर्ष, जिद्द आणि न्यायालयीन लढाई जिंकून वैद्यकीय क्षेत्रात इतिहास रचणाऱ्या डॉ. गणेश बारैया यांची ही थक्क करणारी यशोगाथा.

### ...आणि वडिलांनी सर्कसवाल्यांची ऑफर धुडकावली!

लहानपणी कमी उंचीमुळे गणेश यांना अनेक टोमणे ऐकावे लागत होते. प्राथमिक शाळा घरापासून ५ किलोमीटर दूर होती. वाहतुकीची कोणतीही सोय नसल्यामुळे चालून-चालून ते थकून जात. अशा वेळी त्यांचे आई-वडील त्यांना खांद्यावर बसवून शाळेत सोडवायचे. गणेश यांच्या याच ३ फुटी उंचीवर एका सर्कसवाल्याची नजर पडली. त्याने थेट ५ लाख रुपये देऊन गणेशला विकत घेण्याची मागणी केली. मात्र, गरिबीतही गणेश यांच्या वडिलांनी ही मागणी ठामपणे धुडकावून लावली. "मी माझ्या मुलाला शिकवणार आणि त्याचे भविष्य घडवणार," हा वडिलांचा शब्द गणेश यांच्या मनात पक्का रुजला आणि त्यांनी शिक्षणात काहीतरी मोठे करून दाखविण्याचा निश्चय केला.

### ८७ टक्के गुण आणि 'नीट' परीक्षेत देशात २३३ वी रँक!

२०१८ मध्ये गणेश यांनी १२ वीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण मिळविले. त्यानंतर वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेत ऑल इंडिया २३३ वा रँक मिळवून त्यांनी सर्वांनाच चकित केले.



### सर्वोच्च न्यायालयातील ऐतिहासिक लढा

गुणवत्ता असूनही गणेश यांच्यासमोर सर्वांत मोठा अडथळा उभा राहिला. 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया'ने त्यांच्या कमी उंचीमुळे त्यांना एमबीबीएस प्रवेशासाठी अपात्र घोषित केले. '३ फुटी व्यक्ती वैद्यकीय क्षेत्रात योग्य रितीने काम करू शकणार नाही,' असा दावा एमसीआयने केला होता. गुजरात उच्च न्यायालयानेही विरोधात निकाल दिल्यानंतर, गणेश आणि त्यांच्या शिक्षकांनी हार न मानता थेट सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. चार महिन्यांच्या खडतर न्यायालयीन लढाईनंतर सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला, की कोणत्याही उमेदवाराला केवळ त्याच्या उंचीवरून एमबीबीएसची सीट नाकारली जाऊ शकत नाही. या एका निर्णयाने केवळ गणेश यांच्याच नाही, तर देशातील हजारो दिव्यांग मुलांच्या आशा पल्लवीत केल्या.

### ऑपरेटिंग टेबल आणि मित्रांची साथ

वैद्यकीय शिक्षणादरम्यान गणेश यांना त्यांचे शिक्षक आणि मित्रांची मोठी साथ लाभली. सर्जरीच्या वेळी ऑपरेटिंग टेबलवरील रुग्ण व्यवस्थित दिसावा म्हणून त्यांना विशेष मदत केली जात असे. "माझ्या उंचीमुळे मित्रांनी मला कधीच कमी लेखले नाही, उलट नेहमी खंबीर साथ दिली," अशा शब्दांत डॉ. गणेश आपल्या भावना व्यक्त करतात.

### २७ नोव्हेंबर २०२५ : 'डॉक्टर' म्हणून सेवेला सुरूवात

सर्व अडथळ्यांवर मात करत डॉ. गणेश बारैया यांनी आपली पदवी आणि इंटर्नशिप पूर्ण केली. २७ नोव्हेंबर २०२५ पासून त्यांनी भावनगर येथे 'मेडिकल ऑफिसर' (वैद्यकीय अधिकारी) म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले. सुरुवातीला रुग्ण त्यांना पाहून थोडे चकित व्हायचे, पण डॉ. गणेश यांची जिद्द आणि कामाप्रती असलेली निष्ठा पाहून आता रुग्ण त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवतात.

### 'केबीसी'चे आमंत्रण आणि स्वातंत्र्यदिनी मानाचा तुरा!

डॉ. गणेश यांच्या या थक्क करणाऱ्या संघर्षाची दखल बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांनीही घेतली आणि त्यांना 'कौन बनेगा करोडपती' या जगप्रसिद्ध शोमध्ये आमंत्रित केले. तसेच नुकत्याच पार पडलेल्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भावनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयात डॉ. गणेश बारैया यांच्या हस्ते मुख्य अतिथी म्हणून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. ज्या मुलाला कधी समाजाने हिणवले, आज त्याच मुलाला संपूर्ण देश सॅल्यूट करीत आहे.

# मराठी महिन्यांच्या नावामागे आहे आकाश, नक्षत्र अन् हजारो वर्षांची परंपरा!

